**नि. फौ. खं. क्र. ८५/२०१९** **सरकार वि. हसन**

**नि. ६४**

सरकारतर्फे साक्षीदार क्र.०३ यांची जबानी

मी याद्वारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की,

माझे नांव – रइसाबानो

वय – ५५ वर्ष, धंदा – घरकाम

पत्ता – नया बजार, कामठी, जि. नागपूर

**<u>सरतपास अभियोग पक्षातर्फे सरकारी वकील श्रीमती. जुमळे यांचे कडून सुरु</u>**

मी आरोपींना ओळखते. ते माझ्या शेजारी राहतात. दिनांक ३०.१२.२०१८ रोजी आमच्या घरी रात्री १०.०० च्या दरम्यान आम्ही जेवण करून बसलो होतो. त्यावेळी आरोपी जफर हा शिवीगाळ करीत दरवाज्याला धक्का दिला व आमच्या घरी आला. त्यावेळी आरोपी जफर याने माझा मुलगा सद्दाम याला शिवीगाळ करत, धक्के मारून व मारहाण करत घराबाहेर नेले. त्यावेळी आम्ही आमच्या मुलाला सोडवून घरी घेवून आलो. त्यावेळी जफर फोन वर बोलत होता की, हत्यारे घेवून या, या सर्वांना मारून टाकू. त्यानंतर आम्ही आमच्या मुलाला घरात घेवून दार बंद करून घेतले त्यानंतर पाच ते दहा मिनीटानंतर खूप लोक आले व त्यांनी आमच्या घरावर हल्ला केला. ते लोक लोखंडी पाईप घेवून आले होते. ते आमच्या घराच्या काचा तोडत होते व आमच्या घराचा दरवाजा तोडत होते. आम्ही दरवाजा पकडून उभे होतो. आम्ही आमच्या दोन मुलींना आवाजा दिली, त्या वरच्या घरात होत्या त्या देखील तेथे आल्या. त्यानंतर माझा मुलगा दानीश याला आम्ही पाठीमागील दारातून पोलीसांकडे पाठविले. पोलीसांनी अजून काही झाले नाही काही झाले की आम्ही येवू असे सांगितले. त्यानंतर माझी मुलगी जहिना हिने कोणत्यातरी मोठ्या अधिका-याला फोन केला. त्यानंतर आमच्या घरी पोलीस आले. पोलीस येण्याआधीच त्या सर्व लोकांनी दरवाजा तोडून ते आमच्या घरात घूसले होते. त्यानंतर ते सर्व पुरुष व महिला मिळून आम्हा कुटुंबीयांना मारहाण करू लागले. ते बरेच लोक होते. त्यामध्ये गुड्डो देखील होती. तीने मला मारहाण केली. त्यानंतर घटनास्थळी पोलीस आले. पोलीसांनी त्या सर्व लोकांना जावू दिले. एकालाही अटक केली नाही. आम्हा कुटुंबीयाना ते सरकारी दवाखान्यात घेवून गेले. पोलीसांनी माझा बयाण घेतला नाही. ज्या आरोपींनी मला मारहाण केली त्यापैकी आज तीन हजर आहेत. बाकीचे हजर नाहीत. बाकी आरोपींना पाहिल्यास ओळखू शकेल. त्याना मी नावाने ओळखत नाही. मी सर्व लोकांना ओळखू शकत नाही.

**सरतपास पूर्ण**

**<u>उलटतपास आरोपींतर्फे वकील श्री. भिमटे यांच्याकडून</u>**

फिर्यादी माझी मुलगी आहे. मी ४० ते ४५ पासून आमच्या घरी राहत आहे. हे म्हणणे खरे आहे की आरोपी लोक हे माझ्या लग्नापूर्वी पासून आमच्या घरा शेजारी राहतात. आरोपी आमच्या

घराच्या पाठीमागे राहतात. हे म्हणणे खरे आहे की आमच्या घराच्या शेजारी गल्लीतून आरोपींच्या घरी जाण्यासाठी रस्ता आहे. हे म्हणणे खरे आहे की आमच्या घरासमोरच रस्ता आहे. हे म्हणणे खरे आहे की आरोपींना रस्त्यावर येण्यासाठी गल्लीतून यावे लागते. हे म्हणणे खरे आहे की माझी मुलगी फिर्यादी हिला कुत्रे व मांजर पाळण्याचा छंद आहे. हे म्हणणे खरे आहे की आमच्या घरी पंधरा ते वीस मांजरा आहेत. हे म्हणणे खरे आहे की आम्ही भरपूर कुत्रे देखील पाळलेले आहेत. हे म्हणणे खरे आहे की त्या सर्व मांजर व कुत्र्याना खाने पिने आमच्या घरातून देतो. हे म्हणणे खरे आहे की आम्ही त्यांना दुध, भाकरी, मटन व चिकन खायला घातलो. माझी मुलगी आठ ते दहा वर्षापासून कुत्रे मांजर पाळत आहे. हे म्हणणे खरे आहे की कुत्र्याना खायला घातलाना आजूबाजूचे इतर कुत्रे आल्यास त्यांना देखील आम्ही खायला घातलो. हे म्हणणे खरे नाही की मांजरांना जे खायला देतो तेच कुत्र्यांना देखील खायला घेतो. हे म्हणणे खरे नाही की कुत्र्यांना मटर चिकन खायला घातले असता ते एका ठिकाणी न खाता ते इकडे तिकडे फिरून खात असतात. हे म्हणणे खरे नाही की त्यामुळे शेजारी परीसरात गंदगी पसरत असते. हे म्हणणे खरे आहे की आमचे व आरोपींचे घर स्लॅपचे आहे व त्यामध्ये एक गल्ली आहे. हे म्हणणे खरे नाही की आम्ही मांजरांना खायला घातल्या नंतर ते आरोपींच्या घराच्या स्लॅपवर खाने घेवून जात असतात.

हे म्हणणे खरे आहे की आमच्या घराच्या शेजारी बरीच राहती घरे आहेत. हे म्हणणे खरे आहे की वस्तीमध्ये बरीच लहान मुले आहेत. हे म्हणणे खरे नाही की कुत्रे व मांजर लहान मुलांना देखील चावत व बोचकारत असतात. हे म्हणणे खरे नाही की माझ्या मुलीविरुध्द वस्तीच्या लोकांनी नगरपरिषद व पोलीस ठाण्यात तक्रार दिली होती. हे म्हणणे खरे आहे की आरोपी जफर यांच्या घरी लहान मुले आहेत. हे म्हणणे खरे आहे की घटनेपूर्वी देखील आरोपींसोबत जनावरावरून भांडणे झाली आहेत. हे म्हणणे खरे नाही की आरोपी जफर याने फिर्यादी विरुध्द तक्रार केली होती. हे मला माहिती नाही की जनावरे पाळण्यासाठी नगरपरिषदेमधून परवानगी घेतली आहे किंवा नाही. हे मला माहिती नाही की मांजर चावल्यामुळे प्राणघातक आजार होतो. हे म्हणणे खरे नाही की आरोपी जफर व त्याचे कुटुंबीय व वस्तीवाले तक्रारी करतात म्हणून माझ्या मुलीने आरोपींविरुध्द खोटी फिर्याद दाखल केली आहे. हे म्हणणे खरे नाही की सरतपासात सांगितलेला संपूर्ण मजकूर खोटा सांगितला आहे व खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण**

**फेरतपास काही नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत/समक्ष

स्वाक्षरी /-

**(सागर एस. जाधव)**

**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, न्या. क्र. २, कामठी.**

ठिकाण –कामठी

**दिनांक – १७/०१/२०२४**